CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com ▪ सोमवार, दि. ५ फेब्रुवारी २०२४ ▪ ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १२७ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## वाहनाच्या धडकेत शेतकऱ्याचा मृत्यू

✔ **सोलापूर :** ज्वारी काढणीचे काम करून घराकडे परतत असताना वाहनाची जोराची धडक बसून जालीहाळ मधील शेतक-याचा जागीच मृत्यू झाला तर एक जण गंभीर जखमी झाला. अपघातानंतर वाहनचालक फरार झाला.

शिवाजी कांबळे (वय ६०, रा. जालीहाळ) असे जागीच मरण पावलेल्या शेतक-याचे नाव असून हा अपघात रविवार, ४ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता झाला. याबाबत मुलगा नवनाथ कांबळे याने मंगळवेढा पोलिसात फिर्याद दिली आहे.

पोलिस सूत्राकडील माहितीनुसार सध्या दक्षिण भागातील अनेक गावात मजुरांना हाताला काम नसल्यामुळे रब्बी हंगामात मंगळवेढा शिवारात ज्वारी काढणीसाठी मजुरी मिळत असल्याने जावे लागत आहे. शिवाजी कांबळे व भारत व्हरगळ हे दोघे मंगळवेढा शिवारात ज्वारी काढणीचे काम संपवून दुपारी जालीहाळ येथे घराकडे दुचाकी (एम.एच. १४/ ए.यु.१७२९) वरून परतत होते. हिवरगाव-जालीहाळ रस्त्यावर विद्यानिकेतन विदयालयाजवळ हाजापूरकडून भाळवणीकडे निघालेल्या वाहनाने जोराची धडक दिली.

या अपघातात भारत व्हरगळ हे गंभीर जखमी झाले तर शिवाजी कांबळे याचा जागीच मृत्यू झाला. भारत व्हरगळ यास शासकीय रुग्णवाहिकेतून उपचारासाठी पाठवण्यात आले. अपघातानंतर टेम्पो घटनास्थळी न थांबता चालक फरार झाला.

# ‘राष्ट्रवादी’मध्ये घमासान, कुणाचे ऐकायचे?

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजूनही घमासान सुरू आहे. काका आणि पुतण्या यांच्यातील संघर्ष पक्षाला आणि कार्यकर्त्यांना कोठे नेवून ठेवणार आहे कोणास ठाऊक? जायचे कोणाकडे? काका की पुतण्या? ही विवंचना साऱ्यांनाच सतावत आहे. आता ते दोघे एक होतील,याची शाश्वती नेत्यांना वाटत नाहीय.रविवारी बारामतीत अजितदादांनी एक वक्तव्य केले.ते शरद पवार गटाच्या जिव्हारी लागले आहे.शरदराव यांचे विश्वासू आ.जितेंद्र आव्हाड यांनी दादांच्या वक्तव्याची चिरफार करून टाकली आहे. एकूणच रागरंग पाहाता राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोनही गटांमध्ये घमासान सुरू असल्याचे पहायला मिळत आहे.



## इतकी वर्षे वरिष्ठांचे ऐकलो, आता माझे ऐकावे लागेल

बारामतीतल्या कार्यक्रमात अजितदादा म्हणाले की, आजपर्यंत काहीही मागितलेले नाही. मी आता फक्त तुम्हाला मते मागतो आहे. मी खासदारकीला उमेदवार देणार आहे.इथे येवून कुणीतरी भावनिक बोलतील.शेवटची निवडणूक आहे,असे कदाचित म्हणतीलही.पण त्यांची शेवटची निवडणूक कधी आहे हे माहीत नाही, मी इतकी वर्षे वरिष्ठांचे ऐकले आता माझे ऐका. दादांचा हा रोख शरद पवार यांच्यावर होता, असे मानले जात आहे.

मी तुम्हा सगळ्यांना सांगू इच्छितो की- एकीकडे अजित तुम्हाला सांगतो आहे,दुसरीकडे वरिष्ठ सांगतो आहे. कुणाचे ऐकायचे? इतकी वर्षे वरिष्ठांचं ऐका. उद्या माझ्या विचारांचा खासदार दिला तर मी पंतप्रधान मोदींनी सांगेन की- माझ्या लोकांनी हा खासदार दिला आहे. आपली कामे झाली पाहिजेच या दृष्टीने अडी-अडचणीला कोण मदत करतो याचा विचार करा. असेही अजित पवार म्हणाले.

माझी तुम्हाला विनंती आहे की लोकसभेची निवडणूक आधी येणार आहे. त्या निवडणुकीत तुम्हाला मला पावती द्यायची असेल तर बारामतीत जो बदल आणि जे काही काम चालले आहे जे निर्णय मी विकासासाठी घेतले ते लक्षात ठेवा. धाडस दाखवल्यावरच कामे होत असतात. उद्या जेव्हा खासदारकीच्या निवडणुका येतील. मी उमेदवार जाहीर करेन तिथे मी उभा आहे (अजित पवार) असे समजून मते द्या हे मी तुम्हाला सांगतो.

कुणी भावनिक होतील.. आमची शेवटची निवडणूक आहे म्हणतील. अमकंच आहे, तमकंच आहे म्हणतील. त्यांची शेवटची निवडणूक कधी होणार आहे माहीत नाही. तुम्ही भावनिक होऊ नका अशी माझी विनंती आहे. असं अजित पवार म्हणाले.

मला तुम्हाला इतकंच सांगायचं आहे आपल्या कामांचा वेग असाच राहण्यासाठी माझ्या विनंतीला मान देऊन सहकार्य करावं. आपण सगळ्यांनी बारकाईने विचार करा. तुम्ही मला योग्य सहकार्य केलं तर पुढची कामे होतील, नाहीतर मी तुमची कामं करण्यास बांधील नाही हे स्पष्टपणे मी तुम्हाला सांगू इच्छितो. असंही अजित पवार त्यांच्या भाषणात म्हणाले.



## काकांच्यामृत्यूचीवाटपाहतायेत, अशा नेतृत्वाची लाज वाटते

बारामतीत आज अजित पवारांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी सांगितलं की लोकसभा निवडणुकीसाठी मी लवकरच उमेदवार जाहीर करणार आहे. त्यावेळी काही लोक येतील भावनिक साद घालतील, ही शेवटची निवडणूक आहे सांगतील. पण तुम्ही मात्र अजित पवार उभा आहे हे समजून मतदान करा. शेवटची निवडणूक सांगतील, कधी शेवटची निवडणूक असेल काय माहीत. असं वक्तव्य केलं होतं. अजित पवारांनी नाव न घेता ही टीका शरद पवार यांच्यावर केली होती. त्यानंतर आता या वक्तव्याचे पडसाद उमटू लागले आहेत, असं म्हणत जितेंद्र आव्हाड यांनी त्यांना प्रत्युत्तर दिलं आहे.

अजित पवारांच्या वक्तव्याला आव्हाड यांनी सडेतोड उत्तर दिले आहे. अजित पवारांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधत असताना हद्द ओलांडली आहे. एखाद्या माणसाच्या मृत्यूची प्रार्थना करणे, याचना करणे हे माणुसकीला शोभणारे आहे काय याचा विचार अजित पवार यांनी जरुर करावा.मला अजित पवारांबरोबर काम केल्याची लाज वाटते, अशी शब्दात आव्हाड यांनी अजित पवारांवर टीका केली.

आपल्या काकांच्या मृत्यूची वाट बघतोय, हे राजकारण आहे का अजित पवार? भावनिक आवाहन करतील, ही शेवटची निवडणूक असेल. काय माहीत शेवटची निवडणूक कधी असेल? शरद पवार आहेत ते अजरामर राहतील, त्यांचे योगदान अजरामर असणार आहे हे विसरु नका. आज अजित पवारांनी सगळी हद्दच ओलांडली,असेही आव्हाड म्हणाले.

जितेंद्र आव्हाड म्हणाले, आपली उंची ओळखा कुठे शरद पवार आणि कुठे तुम्ही? अटल बिहारी वाजपेयी, मनमोहन सिंग हे देखील नाव काढायचे. लाज वाटते मला तुमच्या सोबत काम केल्याची. आधी पण वाटतच होती. शरद पवार देशाचे नेते तुम्हाला महाराष्ट्रात कोण ओळखत नाही. ज्या कुटुंबाने तुम्हाला सर्व दिले, ज्या माऊलीने तुम्हाला सर्व दिले तीच कुंकू कधी पुसले जाईल याची आज तुम्ही वाट बघता असल घाणेरडं राजकारण महाराष्ट्राने कधी बघितलं नाही.

शरद पवार यांचे प्रत्येक निर्णय महाराष्ट्राच्या हिताचे आहेत. तुमचा एक निर्णय दाखवा. अजित पवार यांनी त्यांचं दिल्लीतल एक भाषण दाखवावं. साहेबांची खरी चूक आहे साहेबांनी अजित पवारला कधी ओळखलं नाही. राज्य उत्पादन मागितलं ते दिल फक्त पैसे खाण्यासाठी. शेवटच्या निवडणुकीची वेळ तुमच्यावर पण येणार आहे. अजित पवार हा महाराष्ट्राचा नेता म्हणून लाज वाटते. शरद पवार यांच्या मृत्यूची वाट बघणारा कलंकित अजित पवार महाराष्ट्राला आणि



## अकलूज येथे ट्रॅव्हल्सच्या धडकेत दोन जिवलग मित्र ठार

✔ सुराज्य/अकलूज



**विकास अरुण रिसवडकर हे केवळ दीड वर्षाचे असताना त्यांच्या आईचे निधन झाले.त्यानंतर त्यांच्या वडिलांचे निधन झाले. विकास रिसवडकर यांना भाऊ-बहीण कोणीही नसल्याने त्यांचे तीन मामां प्रशांत जगताप, मिलिंद जगताप व अकलुज ग्रामपंचायत चे माजी सदस्य राहुल (बंटी) जगताप यांनी त्याचा सांभाळ केला होता. तर शुभम हा सेवानिवृत्त शिक्षक शिवाजी पांढरे यांचा मुलगा असून त्याच्या पश्चात आई-वडील भाऊ असा परिवार आहे.**

येथील सहकार महर्षी पेट्रोल पंपासमोर पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या ट्रॅव्हल बसने दुचाकीवरुन जाणाऱ्या दोन तरुणांना जोरदार धडक दिली. त्यात दोन जिवलग मित्र ठार झाले. ट्रॅव्हल्सचा चालक अक्षय रणवरे याला अकलूज पोलिसांनी अटक केली.

विकास रिसवडकर आणि शुभम पांढरे हे लहानपणापासूनचे जिवलग मित्र होते. या भीषण अपघातात बालपणापासुनचे जिवलग मित्र असणाऱ्या दोन तरुणांचा अंत झाला. दोघांचा एकाच वेळेस अपघाती मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी, सदरची घटना शनिवारी रात्री १० वाजण्याचे सुमारास सहकार महर्षी पेट्रोल पंपावर दुचाकीत पेट्रोल भरण्यासाठी विकास अरुण रिसवडकर (वय २६, रा. मसूद मळा) माळीनगर रोड, कर्मवीर चौक, अकलूज व शुभम शिवाजी पांढरे (वय २६, रा. संयुक्तानगर शंकरनगर) हे दोन जिवलग मित्र जात असताना समोरून येणाऱ्या जत, जि. सांगली येथील ट्रॅव्हल्स बस नं.एन.एल.- ०१-बी-३०१३ या निखिल ट्रॅव्हलच्या बसने दोन तरुणांना धडक दिली.

यातील विकास अरुण रिसवडकर (वय-२९) वर्षे यास डोक्याला व तोंडाला गंभीर दुखापत झाली होती. तसेच बॉबी उर्फ शुभम शिवाजी पांढरे (वय २९, रा. संयुक्तानगर, शंकरनगर, ता.माळशिरस) याच्याही डोक्यास गंभीर दुखापत झाली होती. दोघांचाही रक्तस्त्राव झाला होता. अपघातानंतर त्यांना उपचारासाठी घेवून गेल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मयत झाल्याचे सांगितले.

या दोघांचा अकलूज येथील अकलाई मंदिराजवळ असलेल्या स्मशानभूमीत एकाचवेळी रविवार, दि.४ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी १० वा. अंत्यविधी करण्यात आला. राहुल दत्तात्रय जगताप (वय- ४३, व्यवसाय शेती, रा.अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन खुडुस (ता. माळशिरस, जि. सोलापूर) येथील रहिवासी असलेला ट्रॅव्हल्सचा चालक अक्षय रणवरे याला अकलूज पोलीसांनी अटक केली. पोलीसांनी चालका विरुध्द भारतीय दंड संहिता १८६० कलम २७९, ३०४, ३३६, ३२० १८६ ४२७ व मोटरवाहन अधिनियम, १८४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## नवविवाहितेची आत्महत्या; पती आणि दीराला अटक

✔ **करकंब** : सासरी होत असलेल्या जाचास कंटाळून एका २० वर्षीय नवविवाहितेने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना व्होळे (ता.पंढरपूर) येथे शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात करकंबच्या पोलिसांनी मयताच्या पतीसह चौघांवर हुंडाबळीचा गुन्हा दाखल करून दोघांना अटक करून पोलीस कोठडी घेतली आहे. सुरेखा किरण हेगडे (वय २०, रा.व्होळे) असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी तिचा पती किरण हेगडे, शशिकला हेगडे (सासू), दीर शुभम हेगडे आणि त्याची पत्नी मोहिनी (सर्व रा. व्होळे) या चौघांविरुद्ध पोलिसांनी पुन्हा दाखल करून दोघांना अटक केली. यासंदर्भात मयत सुरेखा हेगडे हिचे भाऊ अक्षय संजय ऐवळे (रा.पेनुर,ता.मोहोळ) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्यांच्या बहिणीचा विवाह १३ जून २०२३ रोजी झाला होता. विवाहानंतर सासरी तिला अपमानास्पद वागणूक देऊन छळत होते. त्यांच्या जाचारू कंटाळून आपल्या बहिणीने आत्महत्या केली, असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक कुंजीर करीत आहेत.

## कोरवली येथे शेत जमिनीच्या वादातून दोन गटात तलवार आणि कोयत्याने हल्ला

✔ सुराज्य/सोलापूर

### ५ जणांना अटक

कोरवली (ता.मोहोळ) येथे शेत जमिनीच्या वादातून विभुते आणि माळगोंडे यांच्या गटात कोयता, तलवार आणि लोखंडी रॉडने झालेल्या हाणामारीत चौघेजण जखमी झाले. ही घटना शुक्रवारी दुपारच्या सुमारास कोरवली येथील राजमाने यांच्या शेताजवळ घडली.

या प्रकरणात कामतीच्या पोलिसांनी परस्परविरोधी फिर्याद नोंदवून दोन्ही गटातील ७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. त्यापैकी ५ जणांना अटक करून पोलीस कोठडी घेण्यात आली आहे.

राहुल अमोगसिद्ध विभुते (वय ३०, रा. कोरवली) याने दिलेल्या फिर्यादीवरून धर्मराज बलभीम माळगोंडे, त्याचा मुलगा गणेश माळगोंडे आणि महादेव हनुमंत मम्हमाणे (सर्व रा.कोरवली) या तिघांविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. राहुल विभुते यांचे मयत चुलते नागनाथ यांची शेत जमीन आरोपी धर्मराज माळगुंडे यांनी खरेदी केली होती. मात्र गट विभाजन न झाल्याने त्यांच्यात वाद होता. त्यापैकी पाझर तलावातील शेताची अतिक्रमण पाहण्यासाठी पाटबंधारे विभागाचे अधिकारी शुक्रवारी दुपारी आले होते. त्यांना चुकीची माहिती देत असल्याचे समजल्यानंतर विभुते आणि त्यांचे वडील दुचाकीवरून तलावाकडे निघाले असता त्यांना वाटेत अडवून वरील तिघांनी त्यांना कोयता आणि तलवारीने मारून गंभीर जखमी केले, असे विभूते याच्या फिर्यादीत नमूद आहे. तर धर्मराज बलभीम माळगोंडे (वय ६९, रा. कोरवली) याने दिलेल्या विरुद्ध फिर्यादीवरून अमोगसिद्ध विभुते, त्याचा मुलगा महासिद्ध, राजश्री साधू विभुते आणि महानसिद्ध अशा चौघाविरुद्ध गुन्हा दाखल करून दोघांना दोघांना पोलीसांनी अटक केली.

# मालकांच्या आकटीला पवारांची ‘पॉवर’बाज ऊर्जा!

✔ सुराज्य/खास प्रतिनिधी

**तिऱ्हे (ता. उत्तर सोलापूर) येथील आमदार दिलीप माने यांच्या फार्म हाऊसवर हुरडा पार्टी आणि शीक कडईचा फक्कड बेत झाला. मैत्रीपूर्ण संबंधातून माने यांनी उपमुख्यमंत्री आणि ऊर्जावान नेते अजित पवार यांच्यासाठी हा बेत केला, असे मानले जात असले तरी, या झक्कास बेताला अनेक कंगोरे आहेत. पवार यांच्या हुरडा पार्टीसाठी माने यांनी पेटवलेल्या आकटीला बारामतीकर अजित पवार यांची जणू ‘ऊर्जा’ मिळाली. या आकटीमधून माने यांच्या दक्षिण विधानसभा मतदारसंघातील आमदारकीचा धूर आणि जाळ निघाल्याचे मानले जात आहे.**

खास करून बाब म्हणजे, दिलीप माने यांच्या फार्म हाऊसवर हुरडा पार्टी आणि फक्कड सोलापूर मनाचा बेत करण्यात यावा, असा आग्रह अजित पवार यांचाच होता आणि तसा निरोप त्यांनी दीपक साळुंखे यांच्याकडे दिला होता. त्यामुळे श्री माने यांच्या फार्म हाऊसवरची पार्टी आणि कडक मटणाच्या रश्याचा बेत हे वरवरचे दिसत असले तरी अजित पवार यांनी यातून खूप काही शिजवल्याचे दिसून येते. श्री माने यांच्या फॉर्म हाऊस वर अजित पवारांनी राष्ट्रवादीवाल्यांची केलेली गर्दी हे त्याचेच द्योतक मानले जाते.

सध्या कोणत्याच पक्षात सक्रिय नसलेले मात्र आमदारकीसाठी सज्ज असलेले दिलीप माने हे अजित पवार पर्यायाने एकनाथ शिंदे शिवसेना अजित पवार राष्ट्रवादी आणि भाजप या सहयोगी पक्षांच्या वळचणीला जातील, त्यातही अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या गटात ‘ऊर्जा’ वान नेता म्हणून जातील अशी चर्चा राजकीय विश्लेषकांमध्येही सुरू झाली आहे. अजित पवार आणि दिलीप माने यांचे स्नेहाचे संबंध तसे खूप जुने आहेत. हे संबंध आणि खास करून दिलीप माने यांना आमदारकीचं सिंहासन मिळणे, या पार्श्वभूमीवर खुद्द अजित पवार हे मनावर घेऊन काही वेगळ्या सोंगट्या टाकू शकतात, असेही मानले जात आहे.

## तिऱ्हेच्या फार्म हाऊसवर दिलीप मानेंच्या आमदारकीचा जाळ अन् धूर



**सोलापूर : तिऱ्हे येथील फार्म हाऊसवर हुरड्याचा आस्वाद घेताना अजित पवार. प्रसंगी सुनील तटकरे, दिलीप माने व आदी मान्यवर उपस्थित होते.**

**जागेचा अडसर अन्यथा... :** ‘दक्षिण’मधून आमदारकी लढवण्याची तयारी दिलीप माने यांनी केली आहे. मात्र, दक्षिणची जागा ही भाजपाच्या वाट्याला आहे. तरीही अजित पवार राष्ट्रवादी गट, एकनाथ शिंदे शिवसेना गट आणि भाजप या सहयोगींचा विचार करता, दक्षिणच्या जागेसंदर्भात पर्यायाने दिलीप माने यांच्या आमदारकीसाठी खुद्द अजित पवार काय भूमिका घेतात? कोणत्या वेगळ्या सोंगट्या टाकतात, मानेंसाठी काय करतात, हेपाहणेही तितकेच महत्त्वाचे आहे. माने यांच्यासाठी अजित पवार पर्याय काढू शकतात, असा विश्वासही व्यक्त केला जातोय.

**शिक-कडईवर दादांचा ताव :** दिलीप माने यांनी हुरड्यासोबत खास शिक कडई सोलापुरी मटणाचा बेत केला होता. सोबतीला गावरान कोंबडीचे मटणही होते. अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादीच्या सगळ्यांनीच शिक कडईवर ताव मारला.

**कुकरची शिट्टी अन् घड्याळाचा गजर :** दिलीप माने यांच्या फार्म हाऊसवर जेवणाचा बेत ठेवा. राष्ट्रवादीच्या सगळ्यांना येथे बोलवा हा खुद्द अजित पवार यांचा आग्रह खूप काही सांगणारा ठरावा. सोलापुरात पर्यायाने सोलापूर जिल्ह्यात आपल्या गटाची ताकद वाढावी, काका शरद पवार यांच्या गटापेक्षा आपला गट या ठिकाणी सामर्थ्यशाली ठरण्याचे ईप्सित साध्य करण्यासाठी दिलीप माने यांच्यासारखा ऊर्जावान नेता आपल्याकडे असायलाच हवा. या हेतूनेच अजित पवार यांनी श्री.माने यांच्या फार्म हाऊसवर हुरडा पार्टी आणि स्नेहभोजन ठेवले. इथं दिलीप माने यांच्या ऊर्जावान नेतृत्वाची शिटी वाजली.. शिवाय राष्ट्रवादीचा अजित पवार गट अधिक ताकदवान होण्याच्या पार्श्वभूमीवर, घड्याळाचा गजर ही झाला. भविष्यातील अजित पवार गटाच्या राजकारणाची ही नांदी मानली गेली.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



‘‘इमेज’’

CMYK